महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ३५ /२०२२ दि. २८/०४/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी**, कल्याण शहरात दि. ०३/०५/२०२२ रोजी किंवा एक दिवस मागे–पुढे चंद्र दर्शनाचे दिवशी मुस्लिम बांधवांचा **"रमजान ईद"** हा सण साजरा होणार आहे. कल्याण शहरातील दुर्गाडी इदगाह येथे व समोरील मुख्य रोडवर सार्वजनिक नमाज पठणाचा कार्यक्रम होतो. व रात्रभर सदर परिसरात मुस्लिम बांधवांची मोठया प्रमाणात वर्दळ असते, नमुद वेळी दुर्गामाता चौक, गोविंदवाडी बायपास व कल्याण शहरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता, आम जनतेच्या सोयीसाठी.

**त्याअर्थी** मी, बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) कल्याण शहरातील लालचौकी कडुन भिवंडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना लालचौकी येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने लालचौकी येथे उजवीकडे वळण घेवुन आधारवाडी चौक–वाडेघर सर्कल मार्गे इच्छितस्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) भिवंडी कडुन कल्याण शहरातील आग्रारोड मार्गे गोविंदवाडी बायपास मार्गे कल्याण कडे जाणारे सर्व वाहनांना दुर्गामाता चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदची वाहने दुर्गामाता चौक येथे डावीकडे वळण घेवुन वाडेघर सर्कल–आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) कल्याण (पुर्व) कोळशेवाडी बाजूकडून गोविंदवाडी बायपास मार्गे दुर्गामाता चौकाकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना पत्रीपुल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने पत्रीपुल–शिवाजी चौक–लाल चौकी येथे उजवे वळण घेवून आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४)कल्याण शहराअंतर्गत दुर्गाडी चौक–गोविंदवाडी बायपास–पत्रीपुल मार्गे व दुर्गाडी चौक–शिवाजी चौक–पत्रीपुल मार्गे जाणाऱ्या कंटेनर, ट्रेलर, इत्यादी मल्टीएक्सल/जड–अवजड वाहनांच्या वाहतूकीस रमजान ईदच्या दिवशी पूर्ण वेळ दिवसा व रात्रौ सर्व वेळांत **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही रमजान–ईद सणाचे दिवशी म्हणजेच दि. ०३/०५/२०२२ रोजी अथवा दि. ०४/०५/२०२२ रोजी **(चंद्र दर्शनाप्रमाणे)** रात्रौ ००.०० ते नमाज पठणाचा कार्यक्रम संपे पर्यंते अंमलात राहिल.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने,फायरब्रिगेड,रुग्णवाहिका,ग्रीन कॉरीडॉर,ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर .
मा.पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा.जिल्हाधिकारी, ठाणे
मा.आयुक्त,कल्याण–डोंबिवली महानगरपालिका

Scanned with CamScanner

–प्रादेशिक परिवहन अधिकारी,कल्याण

–पोलीस उप आयुक्त,परिमंडळ–३,कल्याण

–पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.

–पोलीस अधिक्षक,ठाणे ग्रामिण.

–पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा,नवी मुंबई.

–परिवहन व्यवस्थापक, कल्याण/डोंबिवली महानगरपालिका

–विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, कल्याण

–नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत:– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत–सपोआ–कल्याण,ठाणे,उल्हासनगर,भिवंडी वाहतुक विभाग

प्रभारी अधिकारी–कल्याण,कोळशेवाडी,डोंबिवली,कोनगाव,भिवंडी,मुंब्रा,उल्हासनगर,विठठलवाडी,अंबरनाथ वा.उप वि.

Scanned with CamScanner